अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा. क्र.अति.म.आ/(वि)ग.व.नि/3/1028
दि12 /08/२०११

# कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ (S) मधील तरतुदी अनुसरून व मा. महापालिका आयुक्त यांचे ठ.क्र. १/४५५ दि. २९/०७/२००८ चा अधिकारी सुपूर्ती आदेश या अन्वये गलिच्छ वस्ती निर्मुलन या मुख्य खात्याकडील सर्व कामांचे विकेंद्रीकरण झालेले आहे व गलिच्छ वस्ती निर्मुलन खात्याकडील सर्व प्रकरणे व रेकॉर्डस संबंधीत क्षेत्रीय कार्यालयांकडे हस्तांतरीत करणेत आले आहे.

ग.व.नि. मुख्य खात्याकडे केवळ ग.व.नि. अंतर्गत गलिच्छवस्ती निर्मुलनाबाबत जुनी SRD कामांबाबतचा पत्रव्यवहार प्राप्त झाल्यास तो संबंधीत उपआयुक्त १ ते ४ यांना पाठविणे, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, राजीव आवास योजना व महानगरपालिका यात समन्वयक म्हणुन काम पहाणे, BSUP योजने अंर्तगत क्षेत्रीय कार्यालयांकडून प्राप्त होणारी लाभार्थी प्रकरणास मंजुरीसाठी मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांच्याकडे सादर करणे, मा. विधानसभा विधानपरिषद यांच्याकडील तारांकीत अतारांकीत, लक्षवेधीसुचना, औचीत्याचे मुद्दे यांचा समन्वय तसेच मा. लोकायुक्त, मा. उपलोकायुक्त, मा. राज्य माहिती आयोग यांचे कार्यालयाकडून प्राप्त पत्रव्यवहारासाठी समन्वयक म्हणुन काम पहाणे अशी समन्वय खाते म्हणून भूमिका राहणार आहे.

मे. राज्य शासनाचे, गृहनिर्माण व विशेष विभाग अधिसूचना क्र. एससीएस – १९९८/प्रक्र. १८२/ झोपसु/१, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. ३०/११/९८ व मा. महापालिका आयुक्त यांचा ठ.क्र. ०६/०८ दि. २५/०४/२०११ अन्वये गलिच्छ वस्ती निर्मुलन खात्यामधील धोरणात्मक निर्णयाकामी मा. उपआयुक्त (ग.व.नि.) यांना प्राप्त असलेले अधिकार मा. विभागीय आयुक्त १ ते ४ यांना प्रदान करणेत आले आहेत व मे. महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. १७११ दि.०१/०६/२०११ अन्वये प्रसिध्द करणेत आले आहेत. त्यामुळे आता उपआयुक्त (ग.व.नि.) यांचे उपआयुक्त सक्षम अधिकारी (गवनि) म्हणून प्राप्त असलेले सर्व अधिकार संपुष्टात आले आहेत. त्यामुळे उपआयुक्त सक्षम अधिकारी म्हणून घ्यावयाचे सर्व निर्णय जसे झोपडपट्टी पुनर्वसन निर्णय कामी लाभार्थी निश्चीत करणे, लाभार्थी पात्र/ अपात्र ठरविणे व आपल्या भागातील अतिक्रमण काढणे, न्यायालयीन कामे पाहणे इ. स्वरूपाचे कामी कोणतेही निर्णय मा. उपआयुक्त (ग.व.नि.) यांना घेता येणार नसल्याने अशा प्रकरणांचा निपटारा विभागीय आयुक्त (१ ते ४) यांनी आपल्या स्तरावर परस्पर घ्यावयाचा आहे. याकामी कोणतेही प्रकरणा संदर्भात उपआयुक्त (ग.व.नि.) यांजकडेस मार्गदर्शनासाठी/कारवाईसाठी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येऊ नये. आवश्यक असेल तेथे संबंधीत क्षेत्रिय अधिकारी/उपअभियंता यांनी उपआयुक्त/उपअभियंता (ग.व.नि.) यांचेशी समक्ष चर्चा करून प्रकरणी योग्य तो निर्णय घ्यावा.

11/8/2011

अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि)
पुणे महानगरपालिका

**प्रत** – मा. अति. महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहितीसाठी सादर..

१) मा. उपआयुक्त क्र. (१ ते ४)
पुणे महानगरपालिका
२) मा. सर्व क्षेत्रिय अधिकारी
पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहितीसाठी व पुढील कार्यवाही करिता ..

महापालिका आयुक्त (वि)
...लय आवक क्र. १४...
१२/८/२०११
पुणे महानगरपालिका